# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. विद्यापीठ परिपत्रक क्र. ॲपीसी-३०, दि.२२-११-१९८८

२. विद्यापीठ परिपत्रक क्र. ॲपीसी-१, दि.११-०१-२०१८

३. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना क्र.आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२, दि.०६ जून, २०१७

४. कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना क्र.कृषिआ-१६१३/प्र.क्र.१९१/१६-ए, दि.२९ जानेवारी,२०१८

**गट-'क' मधील संवर्गांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करणेबाबत...**

**जा.क्र.२०२४/सं.क्र.४०६/आस्था-३ | 272** **दिनांक ०४-०१-२०२४**

## विद्यापीठ परिपत्रक

**प्रस्तावना-**

विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.इसी-५०/८६, दि.०७.-१०-१९८६ अन्वये, गट-'क' मधील कृषि सहाय्यक व तत्सम पदे यांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यास कार्यकारी परिषदेने मान्यता दिली असून, त्यानुसार संदर्भ क्र. १ वरील विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

तसेच विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.का-४८/०३-११-२०१७ अन्वये विद्यापीठामधील गट-'ड' मधून गट-'क' मध्ये ज्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती झालेली आहे, अशा कर्मचाऱ्यांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यास कार्यकारी परिषदेने मान्यता दिली असून, त्यानुसार संदर्भ क्र. ०२ वरील विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

तथापि संदर्भ क्र. ०३ वरील शासन अधिसूचनेनुसार, बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "लिपीक-टंकलेखक" गट-'क' (सेवाप्रवेश) नियम-२०१७ लागू करण्यात आले आहेत. सदर नियमातील नियम क्र.५ नुसार कनिष्ठ लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा, आवश्यक असल्यास, उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

तसेच संदर्भ क्र. ०४ वरील शासन अधिसूचनेनुसार, कृषि, व पदुम विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या कृषि आयुक्तालयामधील कृषि सहायक पदाबाबत "कृषि सहायक" गट-'क' (सेवाप्रवेश) नियम-२०१८ लागू करण्यात आले आहेत. सदर नियमातील नियम क्र.५ नुसार कृषि सहायक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, आवश्यक करण्यात आलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

उपरोक्त शासन अधिसूचनेच्या अनुषंगाने कृषि विद्यापीठामधील कनिष्ठ लिपीक/तत्सम व कृषि सहाय्यक/तत्सम या गट क मधील संवर्गामध्ये सरळसेवेने अथवा पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्याने विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मा. कुलगुरू महोदय यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

परिपत्रक-

संदर्भ क्र.०३ व ०४ वरील शासन अधिसूचनेतील तरतुदीच्या अनुषंगाने, विषयांकीत प्रकरणी यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भ १ व २ वरील विद्यापीठ परिपत्रक यामध्ये सुधारणा करून, विद्यापीठ सेवेमध्ये गट 'क' मधील कृषि सहायक व कनिष्ठ लिपीक पदावर (सरळसेवेने किंवा पदोन्नतीने) नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे अथवा शासन नियमानुसार सूट मिळविणे अनिवार्य राहील. तसेच यापुर्वी विद्यापीठात सरळसेवेने किंवा पदोन्नतीने कृषि सहायक व कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्त कर्मचा-यांनी सुध्दा विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

(पु. कों. काळे)
कुलसचिव
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

**प्रतिलिपी:** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/विद्यापीठ अभियंता/नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील लिपीकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून द्यावे.*

**प्रत:**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* **वर्ग-'क' मधील संवर्गांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करणेबाबत...** *या शिर्षकाखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*

Computer